# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १४/०७/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १४/०७/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. १०/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १०) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ११) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १२) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १३) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| १५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनप कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला सचिवांनी सुरुवात करावी अशी मी सुचना करतो.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये व मुंबई परिसरामध्ये बॉम्ब ब्लास्टने पश्चिम रेल्वेमधील लोकल गाड्यांवर जो हल्ला झाला. त्याच्यामध्ये अनेक लोकांना मृत्युमुखी पडावे लागलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जवळ-जवळ ३८ लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. असंख्य लोक जखमी झालेले आहेत. म्हणजे शहराला एक प्रकारचा हादरा आणि हादसा बसलेला आहे. त्याच्यामधुन आपण आणि शहर ह्या हादस्यामधुन लवकर मुक्त होऊ शकत नाही. कारण शेवटी मानवी जीवन किती काळ असायला पाहिजे आणि त्यांना अघोरीरित्या काळ यावा ही दुर्देवाची बाब होती. म्हणुन मी सर्व सदस्यांच्या वतीने या ठिकाणी शोक प्रस्ताव मांडत आहे. तसेच, त्याच्यामध्ये एक खासदार कै. वसंत चव्हाण साहेब यांचे ह्रदय विकाराच्या झटक्याने निधन झालेले आहे. आम्ही त्याचाही शोक प्रस्ताव मांडत आहोत आणि सर्वांनी मिळून त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली देवुया.

**एस. ए. खान :-**

११ तारखेला संध्याकाळी ७ ट्रेनमध्ये जो बॉम्बस्फोट झाला आणि एक बॉम्बस्फोट भाईंदर व मिरारोड ह्याच्या दरम्यान आमच्या मिरारोड परिसरामध्ये रेल्वे स्टेशनच्या समोर आणि रेडियंट सोसायटीसमोर आणि लोढा कॉम्प्लेक्ससमोर झाला. तसेच, त्या दिवशी बॉम्बस्फोट झाल्यानंतर ताबडतोब मला फोन आला की, आमच्या रेडियंट सोसायटीचे तरुण मुलांनी आणि लोढा कॉम्प्लेक्सच्या तरुण मुलांनी सर्व रिक्षा बांधवांनी सर्व रिक्षा घेऊन ताबडतोब दोन तासामध्ये सर्व जखमींना आणि जे मृत्युमुखी पडलेले होते. त्यांना जे-जे जवळचे हॉस्पीटल होते तेथे ॲडमीट केले आणि ताबडतोब त्यांच्यावर उपचार करण्यात आले. तसेच, ज्या तरुण मुलांनी ही कामगिरी केली मी त्यांचे कौतुक करतो.

**मोहन पाटील :-**

कौतुकाचा विषय चालु मिटिंगमध्ये येईल.

**जयंत पाटील :-**

आपल्या शहरामध्ये जी दुःखद घटना घडली त्याच्यामुळे आपले शहर हादरलेले आहे.

**गजानन भोईर :-**

ही दुःखद घटना घडली तेव्हा आपल्या महानगरपालिकेतील सगळ्या अधिकाऱ्यांनी हॉस्पीटलला भेट देऊन सहाकार्य केलेले आहे. याच्यामध्ये सगळ्यांचा सहभाग आहे आणि प्रत्येकाने सहकार्य केलेले आहे.

**एस. ए. खान :-**

सर्वप्रथम तेथील लोकांनी मदत केली. नंतर महापालिकेने मदत केली आणि त्याच्यानंतर इतर क्षेत्रातील विभागांनी मदत केली.

**मोहन पाटील :-**

हा विषय मिटिंग चालु होईल तेव्हा पुढच्या मिटिंगला मांडा.

**रतन पाटील :-**

हा विषय महासभेत मांडावा.

**मोहन पाटील :-**

दुसरा विषय असा आहे की, मी सर्वांच्यावतीने प्रशासनाला आणि मा. सभापतींना विनंती करतो की, लोकल दवाखान्यामध्ये काही ठिकाणी जे पेशंट आपण दाखल केले त्यांना डॉक्टरांचे सहाकार्य मिळाले. परंतु, काही ठिकाणी सहकार्य मिळाले नाही. त्याबाबतीमध्ये जो खर्च करावा लागला त्या खर्चासाठी काही लोकांनी डिपॉझीट आधीच मागीतले. मी प्रशासनाला आणि मा. सभापतींना सर्व स्थायी समितीच्यावतीने विनंती करतो की, हा सर्व खर्च आपल्या आपल्या महानगरपालिकेतर्फे त्यांना देण्यात यावा. जो खर्च दवाखान्यात झालेला आहे त्याचा सर्व्हे करावा आणि तो खर्च महानगरपालिकेतर्फे द्यावा.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, आपण या लोकांना हॉस्पीटलमध्ये फुकट सेवा देण्याचे डिक्लेअर केलेले होते. परंतु, तरीसुध्दा हॉस्पीटलना पेशंटकडून पैसे घेतलेले आहेत. जर त्या हॉस्पीटलने पैसे घेतले असतील तर त्यांना आपल्यातर्फे ते पैसे परत करण्यात आले का?

**मा. सभापती :-**

तुम्ही आम्हाला काय सांगता? सर्व हॉस्पीटल स्वतः फिरुन बघितलेली आहेत. आम्ही पेशंटना ते पैसे रिटर्न केलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

परवाच्या दिवशी तुंगा हॉस्पीटलमध्ये एका माणसाकडून रु. १४ हजार घेतलेले होते. तुमच्याकडे त्याची नोंद आहे. त्याची कालच मी अधिकाऱ्यांना सांगितलेले होते. वाटल्यास तुम्ही त्या अधिकाऱ्यांना विचारा. कोणीही असे पैसे घेऊ नयेत किंवा देऊ नयेत असे तुम्ही त्या लोकांना सांगावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

या लोकांना सर्वांनी मदत केलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्या महानगरपालिकेतर्फे काहीतरी मदत करा. परंतु व्यक्तीगत मदत करु नका.

**रतन पाटील :-**

तुंगा हॉस्पीटल आणि दिपक हॉस्पीटलमध्ये जे रुग्ण गेले. त्यांना नाकारण्यात आले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, मी आता खुलासा करतो. काल मा. आयुक्त साहेबांच्या सहीने आपल्या शहरातील सर्व हॉस्पीटल्सना तशाप्रकारचे पत्र देण्यात आलेली आहेत. आम्ही त्यांना समक्ष भेटून सांगितलेले आहे. ज्या ठिकाणी तुंगा हॉस्पीटलमध्ये स्पेशल केस आलेली होती त्यांना पैसे परत देण्याचे त्यांनीही मान्य केले आहे. या दुर्दैवी घटनेमध्ये मिरा भाईंदर परिसरातील सर्व सामाजिक, राजकीय, प्रशासकीय आणि धार्मिक ह्यांनी हिरीरीने सर्वांच्या उत्स्फुर्त मनाने दुर्दैवी घटनेला आपण सर्वजण एकोप्याने सामोरे गेलो आणि आपल्या शहरामध्ये एक अमन वातावरण राहिले. याच्यामध्ये सर्वांचे सहकार्य आहे. विशेषतः सर्व दवाखान्यांनी आपल्याला चांगली मदत केलेली आहे. ह्या ठिकाणी सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडलेला आहे. आपण सर्वांनी मृतात्म्यांना श्रध्दांजली वाहुया.

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून मृतात्म्यांना श्रद्धांजली वहावी.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, शहरामध्ये ज्या घटना घडलेल्या आहेत त्याबाबत खरे म्हणजे डॉक्टरानां माहिती आहे की, हे सर्व पेशन्ट बॉम्बस्फोट मधील आहेत. त्यांनी कुठल्याही प्रकारची पैशाची मागणी न करता सेवाभाव या दृष्टीने त्यांना मदत करायला पाहिजे होती. मला एक विनंती करावीशी वाटते की शहरातील सर्व

डॉक्टरांची तुम्ही एक मिटींग घ्या. संपूर्ण डॉक्टर्स जेवढे असतील तेवढ्या आर्युवेदीक वगैरे सर्व डॉक्टरांना अशा सुचना द्या की, आपतकालीन घटनेमध्ये तुमचे संपूर्ण सहकार्य पाहिजे. कुठल्याही प्रकारची पैशाची मागणी न करता तुम्हाला जो खर्च येईल तो कार्पोरेशन पेड करेल आणि त्यावेळेला लागणारी सर्व औषधे महापालिकेतर्फे पुरविली जातील. मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. मी विरारला एक पेशन्ट घेऊन गेलेलो होतो. विरारचे जे पेशन्ट होते त्यांची त्यांची दोन ॲम्ब्युलन्स भरुन गेलेली होती. मी त्यावेळेला तिकडच्या आमदारांचे कर्तुत्व पाहिले. श्री. हितेंद्र ठाकुर तिकडे आले आणि शहरातील सर्व डॉक्टरांना इमिजीएटली पाच मिनिटात फोन केले. सर्व डॉक्टर्स संजीवनी हॉस्पीटलमध्ये आले आणि कुठल्या प्रकारची मागणी न करता किंवा काहीही न करता ताबडतोब बंदोबस्त केला. दोन हजार लोक ज्यांना गाड्या नव्हत्या जी वेट करुन होती. त्यांना भाईंदरमध्ये आणण्याची सोय विरारच्या आमदारांनी केली. हे मी माझ्या नजरेने बघितलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्या कार्पोरेशननेसुध्दा चांगली व्यवस्था केलेली होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

परीवहन सेवेने वसई, विरार, नालासोपारासाठी बसची सेवा पुरवून चांगली मदत केलेली होती.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्या डॉक्टरांची मिटींग घ्या आणि त्यांना बोलवा. अशा काळात तुम्ही आमच्या पेशन्टना छळले तर आम्ही तुमचे लायसन्स बंद करु.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या ठिकाणी दोन गोष्टींचा खुलासा करतो की, सदरची घटना घडल्यानंतर सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेब यांनी म्हटल्याप्रमाणे २० मिनिटांच्या आत सर्वांच्या सहकार्याने रेस्क्यु ऑपरेशन पूर्ण झाले. ज्या लोकांना दुखापत झालेली झाली त्यांना दवाखान्यात नेण्यात आले आणि पोस्टमार्टमसाठी कार्यवाही सुरु करण्यात आलेली होती. ह्याच्यामध्ये सुरुवातीला थोडेफार गैरसमज होते. त्यामध्ये मा. सभापती साहेबांनी सांगितले. आपल्या महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी प्रमाणे प्रत्येक दवाखान्यामध्ये रात्री २ वाजेपर्यंत फिरलेले आहेत. ह्यामध्ये काही डॉक्टरांनी सुरुवातीला व्ह्यू घेतलेला होता की, हा खर्च कसा करायचा? आम्हीसुध्दा मा. आयुक्त साहेबांनी निर्णय दिल्याप्रमाणे तात्काळ सर्व दवाखान्यांना पर्सनली भेटलो आणि सर्व खर्च महापालिका बेअर करेल असे आश्वासन दिलेले होते. त्यामुळे आपल्याला चांगली मदत मिळालेली आहे. त्यामुळे आम्ही सर्व दवाखान्यांना मा. आयुक्त साहेबांच्या सहीने लेखी पत्र दिलेले आहे की तुम्ही तुमचा झालेला सर्व खर्च आम्हाला कळवावा. आम्ही तुम्हाला रिइम्बर्समेन्ट चेक प्रदान करणार आहोत. त्यामुळे शहरामध्ये अशी कुठलीही परिस्थिती नाही. जर अनावधानाने, गैरसमजुतीने अशी परिस्थिती एक-दोन जागांवर आलेली असेल तर मी आपल्या निर्दशनास आणून देतो की, आपल्या शहरातील सर्व डॉक्टर मंडळीने यामध्ये खुप चांगले व मोलाचे सहकार्य केलेले आहे. सिटीस्कॅनपासुन ऑर्थोपेडीकचे लाख रुपयाचे ऑपरेशन केलेले आहे. ज्या नागरिकांना घटना घडल्यानंतर जीवाची पर्वा न करता या ऑपरेशनचा खर्च कसा द्यायचा ही चिंता होती. ज्यावेळेस आम्ही त्यांना बोललो तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील हसु बघून डॉक्टरसुध्दा समाधानी झाले. हा खर्च महानगरपालिका करेल ऐकूण त्यांना बरे वाटले. हा ॲग्रीगेट खर्च एक-दोन दिवसात आपल्या समोर येईल. फार मोठी रक्कम नाही. दवाखानेसुध्दा त्यांचा १०० टक्के खर्च घेणार नाहीत. त्यांनी ओ.पी.डी. सुध्दा फ्री ऑफ कॉस्ट करण्याचे मान्य केलेले आहे. जे मेजर इनपुट म्हणजे औषधे, अवजारे काही एक्सरे, सिटीस्कॅन वगैरे जे काही लागलेले होते, तेवढाच खर्च ते आपल्याला क्लेम करणार आहेत. त्यामुळे शहरात कोणतीही कमतरता राहिलेली नाही. मी या ठिकाणी सर्व पदाधिकारी, सर्व सामाजिक संस्था, सर्वधार्मिय बांधव, विविध पक्षाचे सहकारी, शहर पातळीवरील रिक्षा युनियन पासुन, हॉकर पासुन सर्व नागरिकांनी एकोप्याने आणि सुदृढ भावनेने मदत केली. त्यांचे मी महानगरपालिकेच्यावतीने आभार व्यक्त करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण मिरा भाईंदर क्षेत्रातील ज्या पेशंटना मुंबईत शिफ्ट केलेले आहे. त्याचे कसे करणार आहात? जो मिरा रोडला बॉम्ब स्फोट झाला. त्याच्यामधील काही पेशंट मुंबईत नेले. त्यांचा खर्च कसा करणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आपल्या शहरातील जे नागरिक बाहेरच्या दवाखान्याला रेफर केलेले आहेत. आपण त्यांचा अभिप्राय मागवून घेऊ आणि त्यांना रिइम्बर्समेन्ट करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या मिरा भाईंदरच्या करुणा हॉस्पिटलमध्ये चार - पाच केसेस आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

माझ्याकडे वीस पेशंटची यादी आहे. त्या यादीमध्ये कोणकोणत्या हॉस्पिटलला रेफर केलेले आहे त्याचा उल्लेख केलेला आहे. त्याच्यामध्ये हिंदुजा, नानावटी, बॉम्बे हॉस्पिटल आहे. आमच्याकडे त्याचा रेकॉर्ड आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

भगवती हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यानंतरसुद्धा काही रुग्ण करुणा हॉस्पिटलमध्ये गेलेले आहेत. करुणा हॉस्पिटलमधून नानावटीसारख्या हॉस्पिटलमध्ये शिफ्टींग केलेले आहे.

**रतन पाटील :-**

शासनाने जाहिर केलेले आहे की अशा पेशंटना महापालिकेतर्फे खर्च दिला जाईल.

**गजानन भोईर :-**

मा. उपायुक्त साहेब, मी सुचना करतो की आपत्कालीन परिस्थितीमध्ये अशी ॲक्सिडंट होतात. तर असे काही मेडिसिन मिळतात का? की जे एखद्या एजन्सीशी कॉन्ट्रॅक्ट करुन एका वर्षभरात आपल्याला हवी असेल तर मागवली आणि त्याची एजन्सी वापरुन वर्षभरासाठी आपल्याला औषधाची गरज लागेल तेव्हा महापालिकेत पाठवावी. अशी व्यवस्था करण्यास काही हरकत नाही. जी मेडिसिन पर्टिक्युलर ऑपरेशनसाठी लागतात आपल्याला त्याची व्यवस्था करता येईल. आपल्याला काही ऑपरेशनसाठी जी पर्टिक्युलर मेडिसिन लागतात. आपल्याला मेडिसिन मागवायच असेल तर मागवायचे नाही तर नाही. आपल्याला ज्यावेळेला गरज लागेल त्यावेळेला आपल्याला त्यांनी पुरवठा करायचा आहे. आपण मेडिसिन मागवून ठेवायची नाहीत. कारण ते आपल्याला परवडणार नाहीत.

**प्रभात पाटील :-**

हा हादसा कधी होईल हे आपण सांगू शकत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

बॉम्बस्फोटामध्ये जी लोक मरण पावलेली आहेत त्यांचा खर्चसुद्धा रेल्वेतर्फे दिला जावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

जे सात बॉम्बस्फोट झालेले आहेत. त्याच्यामध्ये भाईंदरचे लोक सात ठिकाणी कुठेही असले तरी ते भाईंदरचे म्हणून मदत करावी. फक्त मिरा रोडच्या लोकांनाच मदत करायची असे नाही.

**प्रभात पाटील :-**

मलासुद्धा हेच म्हणायचे आहे.

**गजानन भोईर :-**

म्युनिसिपालिटी त्या माणसाचा खर्च करेलच.

**मोहन पाटील :-**

भाईंदरमध्ये लोकल ट्रेन बॉम्बस्फोट झाल्यानंतर तो विरारचा माणूस होता की गोरगावमधील माणूस होता हे न बघता त्याचा खर्च करावा लागेल.

**सुर्यकांत भोईर :-**

तो माणूस मुंबईचा असला तरी आपण त्याचा खर्च करायचा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता मुंबईला म्हणजे माटुंग्याला झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये राईची माणसे होती. त्यांनाही सहकार्य करायचे का?

**गजानन भोईर :-**

त्यांची महानगरपालिका त्यांचा खर्च करेल.

**फॅरो ग्रिटा :-**

त्यांना तिकडची महानगरपालिका खर्च करणार आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण आपल्या नागरिकांचा खर्च करायचा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तिकडची महानगरपालिका त्यांचा खर्च करिल? महाराष्ट्र शासनाकडून रुपये १ लाखची मदत आलेली आहे. जखमी झालेल्यांना रुपये ५० हजार मदत जाहिर केलेली आहे. शिवाय, रेल्वेतर्फे रुपये ५ लाख आणि नोकरी अशी मदत जाहिर केलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

आपल्याकडे ॲक्सिडंट झाले तेव्हा करुणा हॉस्पिटल जवळ असल्यामुळे काही लोकांना तिकडे घेऊन गेले. आपल्या परिसरातील माणसाची काळजी आपणच घेणार. साहेबांनी सगळयांचेच कौतुक केलेले आहे व सर्वांनीच कौतुक केलेले आहे. जगातुनही कौतुक होत आहे. माणसाने माणूसकीला जागुन मुंबईमध्ये जे दर्शन घडविले ते अलौकीक आहे. त्याबद्दल वादच नाही. जगातुनच कौतुक होत आहे. परंतु, आपल्या महानगरपालिकेचे माननिय आयुक्त आणि माननिय उपायुक्त यांचे त्याहीपलिकडे जाऊन कौतुक करेन कारण जेव्हा कोणत्याही बॉडीचा किंवा लोकप्रतिनिधींचा विचार विनिमय न घेता त्यांच्या स्वातंत्र्याच्या आधिन राहून किंवा त्यांच्या अधिकाराच्या आधिन राहून त्यांनी औषध - पाणी फ्री करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे तो धाडसी निर्णय म्हणावा लागेल. त्याबद्दल माननिय आयुक्त आणि माननिय उपायुक्त हे सुद्धा कौतुकाला पात्र आहेत आणि मी याठिकाणी त्यांचेही अभिनंदन करित आहे.

**रतन पाटील :-**

सन्माननिय सदस्यांना विनंती आहे की हया एकंदरीत मिरा भाईंदरमधील घटनेचा काळ हा चालत आहे. मागच्यावेळेस जो टी. एम्. टी. च्या बसला अपघात झाला त्याची एक उणीव भासलेली आहे की, जर आपले महानगरपालिकेचे हॉस्पिटल असते तर आणखीनच त्यात भर पडली असती. हे हॉस्पिटल लवकरात लवकर होण्यासाठी सर्वतोपरी सर्वांनी मदत करावी. जेवढया लवकर होईल तेवढया लवकर करा. मी अशा प्रकारे विनंती करीत आहे. सर्वांनी हातभार लावूया. आज ही उणीव भासते. कारण टी. एम्. टी. चा अपघात झाला, बॉम्बस्फोट झाला हयाच्यापुर्वी काही माणसे मेलेली आहे.

**मोहन पाटील :-**

सन्माननिय सदस्य रतन पाटील जी खंत तुम्हाला आहे ती त्याचप्रमाणे सर्वांनाच आहे. पण ऑलरेडी दवाखान्याची सोय केलेली आहे.

**रतन पाटील :-**

लवकरात लवकर होईल अशी सोय करा. लवकरात लवकर होईल अशा पद्धतीने हातभार लावा किंवा त्याला चालना द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ज्या पेशंटने बिले आणलेली आहेत त्यांना पैसे द्या.

**मोहन पाटील :-**

या बॉम्बस्फोटामध्ये जे लोक मृत पावलेले आहेत त्यांना आपण भावपूर्ण श्रद्धांजली वाहूया.

**दुखवटा ठराव क्र. ४६ (अ):-**

दि. ११/०७/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये तसेच मुंबई परिसरामध्ये पश्चिम रेल्वेमधील लोकल गाड्यांमध्ये सात ठिकाणी बॉम्बस्फोट झाला. सदर बॉम्बस्फोटामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात जवळ जवळ ३८ लोक मृत्युमुखी पडले. त्या सर्व मृतात्म्यांना शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

तसेच खासदार श्री. वसंत चव्हाण यांचे ह्रदय विकाराच्या झटक्याने निधन झालेले आहे. त्या सर्व मृतात्म्यांस चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करून त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही सभा सहभागी होत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची ही सभा या ठिकाणी दहा मिनीटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- दुपारी १२.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**